अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

(अधिकार प्रदत्त महाविद्यालय)

# NOTICE

नोटीस क्र. - 205 दि. २२/०८/२०२५

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जात संवर्गातील (कॅटेगरी) व वरिष्ठ महाविद्यालयातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (एस.ई.बी.सी/ओपन कॅटेगरी फक्त वरिष्ठ महाविद्यालय) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना:-

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील एस.सी, एस.टी, एन.टी, ओ.बी.सी, व एस.बी.सी. या जात संवर्गातील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (एस.ई.बी.सी/ओपन कॅटेगरी फक्त वरिष्ठ महाविद्यालय) या सर्व विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता वेबसाईट सुरु झालेली आहे. तरी, या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांनी महाडीबीटी या पोर्टलवर लवकरात लवकर ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरावेत.

वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष बी.ए/बी.कॉम/बी.एस्सी/ बी.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स)/बी.व्होक (फुड प्रोसेसिंग, जर्नालिझम व रिटेल मॅनेजमेंट)/ बी.बी.ए, बी.बी.ए. (सी.ए.), बी.सी.ए (ओपन/एस.ई.बी.सी कॅटेगरी वगळून सर्व कॅटेगरीचे)/ पदव्युत्तर विभागामध्ये एम.ए. सर्व विषय/ एम.कॉम/ एम.एस्सी. (डेटा सायन्स वगळून सर्व विषय)/ एम.एस्सी. (संगणकशास्त्र)/ बी.लिब/ एम.लिब/ डी.टी.एल. (ओपन/एस.ई.बी.सी. कॅटेगरी वगळून सर्व कॅटेगरीचे) विद्यार्थ्यांनी आवश्यक ती मूळ ओरिजनल कागदपत्रे स्कॅन करुन खालील वेबसाईटवर लवकरात लवकर ऑनलाईन फॉर्म भरावेत. या कालावधील सर्व विद्यार्थ्यांनी आपले शिष्यवृत्तीचे फॉर्म खाली दिलेल्या वेबसाईटवर भरावेत.

**Website- www.mahadbt.maharashtra.gov.in**

### ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे

१) विद्यार्थ्यांचा स्वतःच्या नावाचा जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

२) एस.सी., एस.टी. या कॅटेगरीसाठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.२,५०,०००/- (अक्षरी- दोन लाख पन्नास हजार रुपये) पर्यंत आहे. सन २०२४-२०२५ मधील मा. तहसिलदार यांचा विद्यार्थ्यांच्या वडीलांचे नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

३) एस.सी., एस.टी. फ्रिशिपसाठी उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

४) एन.टी/ओ.बी.सी/एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी स्कॉलरशिपसाठी उत्पन्नाची मर्यादा १,५०,०००/- (अक्षरी- एक लाख पन्नास हजार रुपये) पर्यंत आहे. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

५) बी.सी. फ्रिशिप या योजनेमध्ये एन.टी., ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीच्या विद्यार्थ्यांनी मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा. उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी- आठ लाख) पर्यंत एवढी आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त आहे अशा विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे/अपलोड करणे अनिवार्य/बंधनकारक आहे.

६) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (ओपन) कॅटेगरीतील विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी-आठ लाख) पर्यंत आहे. विद्यार्थ्यांनी मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

७) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (एस.ई.बी.सी.) या कॅटेगरीतील विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी-आठ लाख) पर्यंत आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न आठ लाखापेक्षा अधिक आहे अशा विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे/अपलोड करणे अनिवार्य आहे. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

८) वडील हयात नसतील तर आईचे नावाचा २०२४-२५ मधील तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला व सोबत वडीलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. अन्य कारणे असल्यास ॲफिडेविट जोडावे.

९) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेश फीचे चलन अपलोड करणे

१०) आधारकार्ड बॅकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न लिंक असणे आवश्यक आहे.

११) मागील वर्षाचे मार्कशिट झेरॉक्स व इयत्ता १० वीचे गुणपत्रक सर्वांनी जोडावे.

१२) डोमासाईल सर्टिफिकेट जोडावे.

१३) गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हिट आवश्यक आहे.

१४) शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. झेरॉक्स जोडावी.

१५) विद्यार्थ्यांचे स्वत:चे राष्ट्रीयकृत बँकेत किंवा इंडिया पोस्ट बँकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे. सदरचे खाते आधार कार्ड व मोबाईल नंबरला संलग्न लिंक असावे.

१६) महाडिबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र संपूर्ण माहिती भरुन अपलोड करावे.

१७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेल्स या कॉलम मध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँकखात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१८) स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल्स् या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅन्ट मध्ये असेल तर **Aided** करावे व नॉनग्रॅट मध्ये प्रवेश असेल तर **UnAided** करावे. तसेच कॉलेजचे नाव खालील प्रमाणे बरोबर सिलेक्ट करावे.

१९) विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचा फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होत व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

२०) विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/ सिलेक्ट करावे.

**Senior College- Tuljaram Chaturchand College (0)**

**Junior College- Tuljaram Chaturchand College (27250211827)**

**Vocational (Jr.College) (MCVC)-ANEKANT EDUCATION SOCIETY'S TULJARAM CHATURCHAND COLLEGE (2765211090)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात सायबर झोनमध्ये विनामूल्य सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. विद्यार्थ्यांनी फॉर्म भरल्यानंतर फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे स्वतःजवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची आवश्यकता नाही.

ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरणे अनिवार्य आहे. अन्यथा विद्यार्थ्यांना उर्वरित फी भरावी लागेल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी व होणा-या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2024-2025\NOTICE 2024-25.docx